# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.08.2024** **वारःबुधवार**

---

1. 78व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशाला संबोधित करणार
2. विदर्भ आणि मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देणाऱ्या प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
3. यंदाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर आणि
4. हर घर तिरंगा अभियानाचा राज्यभरात उत्साह

**<u>राष्ट्रपती</u>**

देशाच्या 78 व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशाला संबोधित करणार आहेत. आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून संध्याकाळी सात वाजता त्याचं प्रसारण होईल. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र आज संध्याकाळी पावणे सात वाजता प्रसारित होईल. दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरूनही आधी हिंदीत आणि त्यानंतर इंग्रजीत राष्ट्रपतींचं संबोधन प्रसारित केलं जाईल. त्यानंतर दूरदर्शनच्या प्रादेशिक वाहिन्यांवर प्रादेशिक भाषांमध्येही याचं प्रसारण होईल. आकाशवाणीवरून रात्री साडे नऊ वाजता हे संबोधन प्रादेशिक भाषांमधून प्रसारित केलं जाईल.

**<u>आमंत्रण-पालघर</u>**

दिल्लीत लाल किल्ल्यावर उद्या होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला देशभरातील विविध क्षेत्रातील अनेक नागरिकांना आमंत्रित करण्यात आलं असून पुणे जिल्ह्यातल्या मुळशी तालुक्यातील शिक्षक संजय मारणे, ठान गावच्या नीलम दिवेकर, तसंच पालघर जिल्ह्यातल्या डहाणू इथला प्रकेत पंडित दिल्लीतल्या स्वातंत्रदिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**<u>मंत्रीमंडळ-निर्णय</u>**

विदर्भ आणि मराठवाड्यातील 19 जिल्ह्यांमध्ये दुग्ध विकासाला गती देण्यासाठी दुग्धविकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. दुग्धविकास प्रकल्पासाठी 149 कोटी रुपये खर्चाला यावेळी मान्यता देण्यात आली. विदर्भ आणि मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये 2026-27 पर्यंत हा प्रकल्प राबवण्यात येईल.

मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम आणि देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे या जमिनी ताब्यात असणाऱ्यांच्या मालकीच्या होणार आहेत.

राज्यातील निवडून आलेल्या नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे करण्याचा निर्णयही कालच्या बैठकीत घेण्यात आला.

पुण्यातील डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्यालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

**<u>आपत्ती व्यवस्थापन</u>**

नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी 2 हजार 766 कोटी रुपयांच्या 1 हजार 950 कामांना राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत काल मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. मंत्रालयातील राज्य आपत्कालीन प्रतिसाद केंद्र अद्ययावत करण्याचा निर्णय देखील यावेळी घेण्यात आला.

**<u>पुरस्कार</u>**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना या वर्षीचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला आहे. शास्त्रीय संगीतातील योगदानाबद्दल दिला जाणारा भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार आरती अंकलीकर-टिकेकर यांना; तर नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार प्रकाश बुद्धीसागर यांना जाहीर झाला आहे. संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार शुभदा दादरकर यांना; आणि संत साहित्यासंबंधीच्या योगदानासाठीचा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार संजय महाराज पाचपोर यांना जाहीर झाला आहे. 2023 साठीचा तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कार शशिकला सुक्रे यांना; तर 2024 साठीचा पुरस्कार जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे. या पुरस्कारांबरोबरच विविध सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणाही सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काल केली.

**<u>एमटीडीसी</u>**

स्वातंत्र्य दिनी राज्यातील पर्यटन विकास महामंडळांच्या बहुतांश रिसॉर्टमधून उद्या पर्यटकांना तिरंग्याच्या रंगात रंगलेल्या विशेष खाद्य पदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे. ऐकूया त्याबद्दलची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**सध्या देशभर हर घर तिरंगा मोहीम मोठ्या उत्साहात राबवली जात असून सर्वसामान्य नागरिक देखील त्यात आनंदानं सहभागी झाल्याचं चित्र दिसून येत आहे. अशा वेळी राज्यातील पर्यटन विभाग देखील मागे राहिलेला नाही, तर या स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी राज्यभरातील काही ठराविक पर्यटक निवासामधून तिरंग्याच्या रंगात रंगलेले खास पदार्थ पर्यटकांना खाऊ घालण्याची योजना आखण्यात आली आहे. त्यात तिरंगा पुलाव, तिरंगा व्हेज बिर्याणी, तिरंगा टिक्का, तिरंगा हलवा यासारख्या अनेकविध पदार्थांचा समावेश राहणार आहे. पर्यटन महामंडळाची ही अनोखी योजना यंदाच्या स्वातंत्र्य दिनाला खऱ्या अर्थानं मानवंदना देणारी ठरेल यात शंका नाही. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून विनायक सोमणी.**

**<u>हर घर तिरंगा</u>**

संपूर्ण राज्यात हर घर तिरंगा अभियान अत्यंत उत्साहात राबवण्यात येत आहे.

**<u>मुंबईत</u>** विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिका मुख्यालय ते गेट वे ऑफ इंडियापर्यंत तिरंगा यात्रा काढण्यात आली.

**<u>पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर</u>** इथंही स्थानिक प्रशासन, तसंच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तिरंगा फेरी, तिरंगा दौड असे विविध उपक्रम राबवले.

मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काल **<u>चंद्रपूर</u>** इथं आपल्या निवासस्थानी तिरंगा फडकावून हर घर तिरंगा अभियानाला प्रारंभ केला.

**<u>सातारा</u>** नगर परिषदेच्या वतीनं आयोजित तिरंगा फेरीमध्ये एक हजारहून अधिक विद्यार्थी आणि शिक्षक तसंच महिला बचत गटातील सदस्य, स्वच्छता कर्मचारी सहभागी झाले होते.

**<u>सांगली</u>** महानगरपालिकेनं हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत तिरंगा मॅरेथॉनचं आयोजन केलं; तर सांगली जिल्हा प्रशासनानं तिरंगा सायकल फेरी काढली.

**<u>धाराशिव</u>** जिल्ह्यात हर घर तिरंगा अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील महिला बचत गट 80 हजार राष्ट्रध्वजांची निर्मिती करत आहेत.

**<u>वाशिम, अहमदनगर, हिंगोली</u>**, तसंच **<u>नाशिक</u>**मधील चांदवड आदी विविध ठिकाणी अनेक नागरिक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी हर घर तिरंगा अभियानात सहभागी झाले होते.

**<u>वर्धा</u>** इथं केंद्रीय संचार ब्युरो आणि जिल्हा तसंच पोलीस प्रशासनातर्फे आजपासून एका विशेष प्रदर्शनाचं आयोजन केलं जाणार आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महत्त्वपूर्ण घटना, ज्ञात-अज्ञात क्रांतिकारक आणि राष्ट्रपुरुषांची माहिती देणारी दुर्मिळ छायाचित्र या प्रदर्शनात मांडण्यात येतील. येत्या 16 ऑगस्टपर्यंत हे प्रदर्शन सर्वांना पाहता येईल.

**<u>सोलापूर</u>**मध्येही केंद्रीय संचार ब्युरो आणि मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातर्फे प्रदर्शन भरवलं जाणार आहे. यात फाळणीच्या वेळी घडलेल्या घडामोडी आणि स्वातंत्र्यसंग्रामातील महत्त्वपूर्ण घटना मल्टीमीडियाद्वारे प्रदर्शित केल्या जातील.

**<u>संविधान वाचन</u>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीनं स्वातंत्र्य दिनी 'संविधान वाचन' उपक्रम पक्षाच्या प्रत्येक जिल्हा कार्यालयात ध्वजारोहणानंतर साजरा करणार असल्याची माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषदेत काल दिली. पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात तर अन्य जिल्ह्यांमध्ये पक्षाचे वरीष्ठ नेते, मंत्री, आमदार, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष संविधानाच्या प्रस्तावनेचं वाचन करतील असंही त्यांनी सांगितलं.

**<u>डॉक्टर्स संप</u>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवरील लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणाचा निषेध नोंदवण्यासाठी देशभरातल्या निवासी डॉक्टरांनी पुकारलेला संप केंद्रीय आरोग्य मंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेनंतर मागं घेण्यात आला आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.